**कायम स्वयं अर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाचे प्रस्ताव/प्रकल्प अहवालाची तपासणी करण्यासाठी छाननी समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२१/प्रक्र.२७/उद्योजकता**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :१७ एप्रिल, २०२६.

<u>वाचा</u>:-१)कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र.कौविउ-२०२१/प्र.क्र.१४/२०२१/उद्योजकता, दिनांक ०५.०२.२०२१.
२) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. कौविउ-२०२१ / प्रक्र.२७/उद्योजकता, दि. १५.०३.२०२१ व दि.२३.११.२०२२.
३) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. कौविउ-२०२१ /प्रक्र.२७/उद्योजकता, दि. ०८.१०.२०२१.
४) महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४, दि.०७.०८.२०२४.

<u>**प्रस्तावना:**</u>

राज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांचेशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता मार्गदर्शक सूचना दि.०५ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. मार्गदर्शक सूचनांमधील कलम ७ मधील तरतूदीनुसार संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये छाननी समिती गठीत करण्यात आली होती. महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४, दि.०७.०८.२०२४ प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुषंगाने विविध संस्थांकडून/ प्रायोजक मंडळांकडून कायम स्वयंअर्थसहाय्यित खाजगी कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी शासनास प्रकल्प अहवाल प्राप्त होत आहेत. शासनास प्राप्त होणा-या प्रस्तावांची छाननी करण्यासाठी सदर संबंधित अधिनियमातील कलम ४ नुसार नव्याने छाननी समिती गठीत करणे शासनाच्या विचाराधीन होते.

<u>**शासन निर्णय :**</u>

कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठ स्थापन करण्यासंदर्भात शासनास प्राप्त होणा-या संस्थांच्या/ प्रायोजक मंडळांच्या सविस्तर प्रकल्प अहवालांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | सदस्याचे नाव व पदनाम | समितीतील स्थान |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव<br>कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग | अध्यक्ष |
| २ | अपर मुख्य सचिव, (वित्त), वित्त विभाग | सदस्य |
| ३ | अपर मुख्य सचिव, (नियोजन), नियोजन विभाग | सदस्य |
| ४ | अपर मुख्य सचिव, (महसूल), महसूल व वन विभा ग | सदस्य |
| ५ | प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ६ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कौ.रो.उ.व ना. विभाग यांनी नामनिर्देशित केलेले एक विद्यापीठ कुलगुरु | सदस्य |
| ७ | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, कौ.रो.उ.व ना. विभाग यांनी नामनिर्देशित केलेले, कौशल्य व विकास क्षेत्रातील सखोल ज्ञान व अनुभव असलेले दोन (२) विख्यात विद्वान, संशोधक किंवा तज्ञ व्यक्ती | सदस्य |
| ८ | शासन नामनिर्देशीत कौशल्य व विकास क्षेत्रातील दोन तज्ञ | सदस्य |
| ९ | सह सचिव/उप सचिव (उद्योजकता), कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग | सदस्य सचिव |
| १० | कुलगुरू, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई | निमंत्रित सदस्य |
| ११ | आयुक्त, कौ. वि.रो.व उ. आयुक्तालय सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई | निमंत्रित सदस्य |
| १२ | संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई | निमंत्रित सदस्य |

छाननी समितीचे अध्यक्ष, कौशल्य विकास क्षेत्रातील सखोल ज्ञान व अनुभव असलेल्या एका तज्ञ व्यक्तीला निमंत्रित सदस्य म्हणून समितीच्या बैठकीला आमंत्रित करु शकतील. छाननी समितीमधील सर्व निमंत्रित सदस्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

सदर समितीतील निमंत्रित व अशासकीय सदस्यांना मानधन व प्रवास भत्ता संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये लागू केल्यानुसार देय राहील.

२. सदर छाननी समितीमार्फत खालीलप्रमाणे कामकाज पाहिले जाईल आणि खालील कारणांच्या आधारे प्रस्तावाची व सविस्तर प्रकल्प अहवालाची छाननी करील:-

१) शासनास प्राप्त झालेल्या सर्व प्रस्तावांची तपासणी शासनाने निर्धारित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार करावी. महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ मधील कलम ४ नुसार विहित केलेलया व शासन निर्णय दि.०५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये निर्गमित केलेल्या स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठ स्थापनेसाठीच्या मार्गदर्शक सूचनांच्या परिच्छेद ६ मध्ये नमूद केलेल्या बाबींच्या/कारणांच्या अनुषंगाने तपासणी करावी.

२) प्रायोजक मंडळाची आर्थिक सुस्थिती आणि मत्ता तसेच प्रस्तावित विद्यापीठाच्या पायाभूत सुविधा उभारण्यासाठी त्याच्याकडे असलेली क्षमता :

३) प्रायोजक मंडळाची पार्श्वभूमी, म्हणजेच कौशल्य शिक्षण क्षेत्रातील मंडळाची विशेष तज्ञता व अनुभव, त्याचा सर्वसाधारण लौकिक, इत्यादी आणि विनियामक मंडळाची मानके अनुसरण्याची त्याची बांधिलकी :

४) विनियामक मंडळाच्या शैक्षणिक धोरणानुसार, प्रस्तावित केलेला शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन व नवोपक्रम उपक्रम, अभ्यासक्रम तयार करणे याबाबत प्रायोजक मंडळाचे सामर्थ्य व क्षमता म्हणजेच, प्रस्तावित विद्यापीठाच्या उद्दिष्टांमध्ये निश्चित केल्यानुसार अध्ययनक्रमाच्या नाविन्यतेसह समकालीन गरजांनुसार मनुष्यबळ विकसित करण्याची शैक्षणिक कार्यक्रमांची सक्षमता ;

५) प्रस्ताव संबंधित विनियामक मंडळाने विर्निदिष्ट केलेल्या कौशल्य शिक्षणाच्या मानकांशी अनुरुप आहे किंवा कसे :

६) या बाबतीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाच्या अनुरूप प्रस्ताव आहे किंवा कसे.

७) समितीस, महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२४ मधील कलम ४(२) येथील तरतूदीनुसार प्रायोजक मंडळाकडून अन्य माहिती मागविता येईल.

८) समितीस, सविस्तर प्रकल्प अहवालात उणीवा आढळल्यास त्याबाबत बदल सुचविता येतील आणि प्रायोजक मंडळाने विनिर्दिष्ट कालावधीत त्यावर विचार करुन त्यांचे अनुपालन करण्यासाठी, ते त्या मंडळास कळविता येतील.

९) समितीच्या पदसिध्द अध्यक्षांच्या समवेत बैठकीच्या दिनांकापासून दोन महिन्यात आपला अहवाल शासनास सादर करावा.

१०) सविस्तर प्रकल्प अहवालाची सारांश पत्रिका (Summary Sheet) तयार करावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक क्र.२०२६०४१७१५२८०८९३०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANJUSHA AMIT KARANDE

Digitally signed by MANJUSHA AMIT KARANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=4B1C1C68B2FB7D60932C7A539658F299AF288EB5FBE81CEB2178B5DEEA6F7A28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=6BC8432DE7E7323854E5E7499C63951988287A093EF9B088F4B029753EA90109, cn=MANJUSHA AMIT KARANDE
Date: 2026.04.17 15:52:08 +05'30'

**(मंजुषा कारंडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मंत्री (कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव,नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
४) अपर मुख्य सचिव, कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (महसूल),महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई.
७) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १-२, मुंबई /नागपूर.
९) सह सचिव/उप सचिव, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता , मंत्रालय, मुंबई.
१०) कुलगुरू, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मुंबई
११) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई.
१२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
१३) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे (पूर्व) , मुंबई.
१४) निवड नस्ती (उद्योजकता)